: स्फूर्तिस्थान :



राष्ट्रशाहीर
कै. म. ना. नानिवडेकर

शाहीर–महर्षि पां. द. खाडिलकर, एम्. ए. कृत

# शिवशाहिरी पोवाडे



मूल्य १२ रुपये

'अफझलखानाचा वध' हा मराठीतील अग्रगण्य
वीररसाचा पोवाडा निर्माण करून ज्याने
समस्त शाहिरांच्या समोर पोवाड्याचा
आदर्श वस्तुपाठच उभा केला आणि ज्याला
राजमाता जिजाऊंचा आशीर्वाद आणि
प्रत्यक्ष पोवाड्याचा चरित्र-नायक
शिवप्रभू ह्यांचेकडून पुरस्कार लाभला
त्या **शिवशाहीर अज्ञानदास** ह्यांच्या
वंदनीय चरणकमलीं सादर समर्पण—



शाहीरमहर्षि : **श्री. पां. द. खाडिलकर**

**॥ राष्ट्राय स्वाहा ॥ राष्ट्राय इदं न मम ॥** ह्या प्रेरणेतून **'नानिवडेकर शाहिरी संगम'** प्रारंभापासून शाहिरी माध्यमांतून राष्ट्रप्रबोधनाच्या कार्यासाठी झटत आहे.

आमच्या कार्याला प्रोत्साहन म्हणून गुरुवर्य अण्णा (शाहीर पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर) यांनी अंतःकरणपूर्वक आपले आशीर्वाद देऊन आपले साहित्य प्रसिद्ध करण्याचे अधिकार आम्हांस देऊन त्या साहित्याच्या विनिमयांतून शाहिरी संवर्धनाचे कार्य चालविण्याचे काम आमच्यावर सोपवून आमच्यावर जो विश्वास प्रकट केला आहे त्याला पात्र होण्याचा प्रयत्न यथाशक्ति आम्ही करीत आहोत. यापूर्वी गुरुवर्य अण्णांची (१) समर्थ रामदास–नरवीर तानाजी (२) स्वा. सावरकर (३) नवे आकर्षक पोवाडे अशी तीन पुस्तके आम्ही प्रसिद्ध केली व शाहिरी प्रेमींच्या हाती सोपविली. त्यांच्या **पोवाडे भाग २ व पोवाडे–वाङ्मय–दर्शन** ह्या पुस्तकांचा प्रसारही आम्ही करीत असतो. शाहीर खाडिलकर साहित्याच्या प्रकाशनासंबंधी पुढचे पाऊल म्हणून प्रस्तुत **'शिवशाहिरी पोवाडे'** हा श्री छत्रपतींच्या जीवनावरील १० पोवाड्यांचा संग्रह प्रसिद्ध करीत आहोत.

राष्ट्रशाहीर कै. म. ना. नानिवडेकर ह्यांच्या २५ व्या पुण्यतिथि वर्षानिमित्त पाळल्या जाणाऱ्या शाहिरी वाङ्मय प्रकाशनाचा हा उपक्रम होय.

आमच्या आजवरच्या प्रकाशनाप्रमाणे ह्या पुस्तकाचेही सर्वत्र स्वागत होईल ही खात्री आहे.

सदर पुस्तकाचे हस्तलिखित मुद्रणालयांत गेल्यापासून ग्रंथस्वरूपांत ते रसिकांपुढे येईपर्यंतच्या कार्याचा सर्व भार 'मौज प्रकाशन'च्या श्री. भागवत बंधूंनी शाहिरीच्या आपुलकीपोटी उचलून आम्हांस ऋणी करून ठेवले आहे. त्यांच्या स्नेहाचे ऋण शिरी वागविण्यातच आम्हांस भूषण वाटते.

कै. शाहीर खाडिलकर स्मृतिवर्षानिमित्त त्यांची स्मृति जागृत ठेवण्यासाठी हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे.

व्यवस्थापक : **नानिवडेकर शाहिरी संगम**

# शाहीर खाडिलकरांचा आशीर्वाद



श्री. शाहीर महर्षी पां. द.
खाडीलकर एम. ए. बी. टी. टेरेस रूम,
सुशीला निवास, मनमाला टँक रोड,
दादर, माहीम, मुंबई नं. ४०० ०१६.
दिनांक :- १५ ऑगस्ट १९८८

शाहीर सदानंद गणेश कानिटकर ( मु॰ पो॰ कुळगाव ( मांजर्ली ) जि॰ ठाणे आणि शाहीर अशोक शंकर नानिवडेकर १/१८ गोरेगांवकर चाळ, गिरगाव, मुंबई - ४ या शाहीर द्वयांनी शाहिरी संवर्धन संशोधन व संरक्षण या द्वारे महाराष्ट्र शाहिरीची जी सेवा सुरू ठेवली आहे त्याबद्दल मला परम संतोष होत असून या शाहीरद्वयांना त्यांचे या राष्ट्र कार्यात मी अंतःकरणपूर्वक आशीर्वाद देत आहे. महाराष्ट्र शाहिरीची थोर परंपरा पुढे चालविण्यासाठी मी माझे उत्तराधिकारी म्हणून या वरील शाहीरद्वयांची नियुक्ती करीत आहे व त्यांनीही त्यांचे उत्तराधिकारी नियुक्त करावेत अशी माझी इच्छा आहे.

शाहिरी संवर्धनाचे त्यांचे कार्याला उपयुक्त साहाय्य म्हणून माझ्या सर्व किर्तन [illegible], स्फुटगीते, शाहिरी पोवाडे, [illegible] वाङ्मयाचे पुनर्मुद्रणादि सर्व तऱ्हेचे हक्क मी या शाहीरद्वयांना दिले आहेत शिवाय माझे कवितांचे पोवाडे, भाग एक, भाग दोन व पोवाडे वाङ्मय दर्शन ह्या पुस्तकांच्या १०० (शंभर) प्रती ( किंमत रुपये दहा सहस्र अंदाजे १०,०००) मी शाहीरद्वयांना देणगी देत आहे.

त्याचप्रमाणे माझ्या सर्व [illegible] रचना व वाङ्मयाचा पुनर्मुद्रण गायन वगैरे सर्व प्रकारच्या उपयोगातून आणि माझ्या कीर्तन प्रकाशन व्यवहारातून निर्माण होणारे द्रव्य शाहीर द्वयांनी शाहिरी संवर्धनासाठी वापरावे अशी माझी इच्छा आहे. त्याचप्रमाणे शाहिरी वाङ्मय गाणे वगैरे जतन करणे या उपक्रमासाठी माझा वार्षिक वर्गणी द्रव्य शाहीर द्वयांचे अधीन आनंदाने व विश्वासाने स्वाधीन करीत आहे. शाहीर सदानंद कानिटकर व अशोक नानिवडेकर यांना त्यांचे कार्यात शुभ चिंतून हे उत्तराधिकारी नियुक्ती पत्र मी आशीर्वादपूर्वक अर्पतो.

१५-८-८८ पां. द. खाडिलकर

© सर्वाधिकार सुरक्षित, प्रथमावृत्ति (ज्येष्ठ शु. १३ श्री शिवसाम्राज्यदिन, १०-६-१९८७)
मुद्रक : मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४
प्रकाशक : **नानिवडेकर शाहिरी संगम**, १/१८, गोरेगांवकर चाळ, गिरगांव मुंबई - ४०० ००४

# छत्रपतींचा पोवाडा

## शाहीर पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर

शिवछत्रपतींची कीर्ती। गाऊ दिनरात्री। येईल मग स्फूर्ति। जाई भयभीति पार विलयाला। बाळपणीं झेंडा उभा केला। स्वराज्याचा इमला बांधून धन्य तो झाला। पांडुरंग शाहीर गातो त्याच्या कवनाला॥ध्रु०॥ असंख्य तारे तेजबलानें शोभविती आकाशाला। परि शुक्राचा तारा एकच खेचुनि घेतो डोळ्याला॥ दाहकता सूर्याची भरली शिवरायाच्या मूर्तीत। तशि मोहकता चंद्राची ती भरुनि राहिली देहांत॥ वटवृक्षाची विशालता ती कडुलिंबाची कडवटता। आम्रफळाची रसाळता ती बाभळिची ही कंटकता॥ अथांग गंभिरता दरियाची सरोवराची गोडी ती। हिमालयाची असे भव्यता उदारता पृथिवीची ती॥ वैराग्याची शोभा दिसली शिवरायाच्या वृत्तींत। सत्पुरुषांचें दर्शन होते शिवरायाच्या प्रतिमेंत॥ हयपति गजपति धनपति राजा पति सर्वांचा जरि झाला। त्यागी जीवन नित्य तयाचे नमन असो त्या शिवबाला॥ १॥

### चाल

जुलमाचे घोर थैमान माजले सारे॥ वीरत्व लोपले भ्याड झाले हो सारे॥ थरथरती अन्यायापुढे लोक हो सारे॥

### चाल

अशा वेळीं जन्माला आला। एक बाळ धीर देण्याला। जिजाईच्या पोटीं जन्मला। शिवराय नावानं बाळ चमकुं लागला। जिजाईनं धर्म शिकविला बाळ शिवबाला। दादाजी कोंडदेव गुरू राष्ट्रकार्याला। पारतंत्र्य दूर करण्याचा निश्चय केला॥ बाळ आठ वर्षांचा झाला। तेव्हा तेज त्याचे पसरले चारी बाजूला॥ खाटकाच्या सुऱ्याखालून सोडवल एका गायीला॥ २॥

### चाल

रोहिडेश्वरी शपथ घेतली राज्य हिंदवी करण्याला। तोरण गड सर करुनि बांधले तोरण त्यानें किल्ल्याला॥ जुलूम लोकांवरचे सारे हळुहळु त्यानें थांबविले। जीवावरचे सारे धोके धैर्यबळानें संपविले॥

चाल

सूर्य असा हा हळुहळु चढला। अंधार सारा लोपून गेला। घुबडांचा चूत्कार थांबला ॥

चाल

अफझल, फाझल, शिद्दी जोहार शाहिस्ताही हारविला। औरंगजेबाला पार चकविले, आग्र्याहुन सुटुनी आला ॥ लहानपणापासून संकटें अशी आलि बळि घेण्याला। तरी त्या वरती मात करोनी शिवाजी आला उदयाला ॥ ३ ॥

चाल

शिवरायाच्या मनोमंदिरी होति देवता जिजाई माता! स्फूर्ति देवता। सत्त्व देवता। तुळजापुरची भवानी माता। युद्ध देवता। शौर्य देवता। रामदास गुरु राष्ट्रदेवता। तुकाराम वैराग्यदेवता ॥

चाल

१६७४ सालीं। रायगडावरी अभिषेक झाला राजाला। हर्षली धरती शिवाजी राजा गरिबांचा वाली झाला ॥ शिवछत्रपतीचें नाव दुमदुमे जगतीं ॥

चाल

खडा केला भित्रा माणूस। झुंज देण्याला ॥ जी ॥ भ्याडपणा गेला विलयाश। ढाल–तलवार हाती घेतली। थरकांप सुटला शत्रुला। त्यानें दिला न्याय सर्वांला। माणुसकी मंत्र हा झाला। मग तो जुलुम कोणीही केला। तरी त्याचा नाश त्यांनीं केला। असा छत्रपती जगतांत कोणी नच झाला ॥ ४ ॥

चाल

बंधुंनो ऐका या वेळां। शिवाजीचे गुण बाणावे। विचार हा करा। महाराष्ट्र मोठा होऊ दे। नीतिचा झरा ॥ माया ममता वसुंधरेची। भेदक दृष्टी गरुडाची। विरक्तता ती वृक्षाची। राष्ट्रभक्ति ती, ती त्याची ॥ प्रेमळता ही गोमातेची। झेप असे ती चित्याची। निर्मला ती त्या संताची। तळमळ होती मातेची। अशा गुणांची एक संगती। शिवरायाच्या अंगी दिसती ॥

चाल

रामकृष्ण जे कुणी पाहिले जे झाले द्वापारांत। कलियुगांत पुरुषोत्तम झाला असा आमुच्या लोकांत ॥ ५ ॥ फणस दिसे काटेरी परि तो आंत असे अति गोड गरा। वरुनि दिसे तो कडा कोरडा आंत परी अति रम्य झरा ॥ छत्रपती हा राष्ट्रपती हा राष्ट्रोद्धारक जगिं झाला। मानवतेचा खरा पुजारी षड्‌गुण-संपत्ती त्याला ॥ सर्व धर्म सारखेच त्याला भेदभाव नच चित्ताला। जुलुमाचा परि कट्टा शत्रू जुल्म त्यानें चिरडीला ॥ राज्य टाकिले शिवरायानें रामदासांच्या झोळींत। असे थोर हे मन राजाचे तोड नसे या जगतांत ॥ मुसलमान ही कैक धुरंधर होते त्याच्या सेवेंत। सर्वधर्म ते समान मानुनि राज्य चालवी प्रेमांत ॥ शिवरायाचे गुण हे सारे अंगिं बाणवुन या काळा। स्मारक त्याचें मनीं करावे हेच खरे पूजन त्याला ॥ पुतळे देतिल सुख डोळ्यांना, वडवतील गुण तुम्हांला। छत्र-पतीसम व्हावें मोठे तेच विभूषण सर्वांला ॥ वर्णन किती करूं शिवरायाचें पुरें कधिं नच होणारे। जे जे कांही असे चांगलें तें तें येथें दिसणारे ॥ दैवी संपदा पार्थिव देहा इथे राहिली येउनिया। भाग्य आमचें म्हणुन लाभला आम्हाला हा शिवराया ॥ सज्जन रक्षण दुर्जन ताडन हेच कार्य त्या पुरुषाला। महाराष्ट्राच्या भव्य मंदिरी माता दैवत शिवबाला ॥ मातृभक्त गुरुभक्त शिवाजी तसाच जनता भक्त खरा। असे शिवाजी राजे जन हो सदा स्मरा तुम्ही सदा स्मरा ॥ ६ ॥

# राजमाता जिजाबाई यांचा पोवाडा

### शाहिर पां. द. खाडिलकर

सिंदखेडराजाला झाला जन्म जिजाई मातेचा। लखूजी जाधव पिता तियेचा सरदार निजामशाहीचा॥ लखूजी जाधव-कन्या जिजाई मालोजींची ती सून। वीरपत्नी शहाजी राजाची मोठी होती ती गुणवान॥

**चाल**

जिजाबाई आमचं दैवत। मोठं जागृत। स्फूर्ति ती देत। आजही साऱ्या महाराष्ट्रास। दुसरं दैवत नाहीं आम्हांस। तिच्या नांवाचा मोठा विश्वास॥

**चाल**

गुलामगिरीची बेडी तोडून राज्य हिंदवी करण्याला। उत्सुक झाली होती जिजाई, ध्यास लागला जीवाला॥

**चाल**

राजमाता जिजा महशूर। दिगंतावर। केला तिनं थोर। महाराष्ट्राचा राजा शिवराय। दुस्मान करी सदा हाय हाय। धन्य ती जिजा आपुली माय॥

**चाल**

शिवनेरीला जन्म जाहला शिवाजीचा त्या वेळेला। महाप्रतापी बाळ जन्मला, आनंदाला भर आला॥ जिजाबाई देई शिक्षण शिवाजी बाळाला॥ रामायण महाभारत शिकवी ती त्याला॥ दुष्टांचा नाश करण्याला। रामकृष्ण अवतार झाले शिकवलं त्याला॥ लहानाचा मोठा बाळ झाला। अन्यायाची चीड ये त्याला। देवधर्म साधुसंताचा भक्त तो झाला॥ १॥ जिजाबाई आणि शिवराय गेले पुण्याला॥ दादोजी कोंडदेव होते गुरुजी त्याला॥ हिंदवी राज्य करण्याचा संकल्प केला॥ तवां बोलला बाळ आईला। "आई आशीर्वाद दे मला।" रोहिडेश ठेवला साक्षीला। आणि हिंदवी राज्य करण्याच्या घेतलं शपथेला॥ जिजाबाई बोलली त्याला। "बाळा! आशीर्वाद हा तुला। जगदंबा तुझ्या पाठीला। भारी होशिल कळिकाळाला। शिवशंकर यश

देणारा। धन्य धन्य माता ती धन्य बाळ तो झाला ॥ २ ॥ शिवाजीचं मन तिनं भारलं थोर पराक्रम करण्याला। राजा शिवाजी तिनं घडविला, राज्य हिंदवी करण्याला ॥ संकटं आली मोठमोठाली शिवरायावरती जेव्हां। 'पुढेंच जा तूं, मागें सरूं नको', माता बोलली हो तेव्हां ॥ "देवी भवानी प्रसन्न तुजला देईल यश तुज चौफेर। तूं सिंहाचा बच्चा, लांडगे कसे तुला रे धरणार" ॥

चाल

चालून आला अफझलखान। केली त्याची दाणादाण ॥ चालून आला फाजलखान। निसटून गेला वीर महान ॥ चालून आला शास्ताखान। बोटं छाटून केला म्लान ॥ सिंह आग्र्याला सांपडला। तेथूनी पण सुटुनी आला ॥ कैक संकटें प्राणघातकी शिवबावरती जरि आली। तरी न माता डगमगली ॥ ३ ॥

चाल

धीर देत ती पुढे चालली। शिवराज्याभिषेक सोहळा तिनं पाहिला। तृप्त झाला मातेचा डोळा।

चाल

शहाजी राजे नव्हते परि ते सौख्य सोहळा बघण्याला। मनांत येऊन खिन्न जाहली वीरपत्नी ती त्या वेळां ॥ पंधरा दिवस ही पुढें न जगली इहयात्रा ती संपविली। जगदंबेचे नांव घेऊनी परलोकीं निघुनी गेली ॥

चाल

पाचाड गांवी अंत तो झाला। रायगडाच्याच पायथ्याला। धन्य शहाजी धन्य जिजाई धन्य शिवाजी जगिं झाले। मायबाप ही धन्य पुत्र हा धन्य असे जगतीं झाले ॥ घरांघरांतून दर्शन होईल जिजामातेचें ते जेव्हां। भरभराट होईल देशाची निश्चित जन हो मग तेव्हां ॥ जिजाई व्हावें जगांत तुम्ही आया-बहिणींनो ही विनंति। पांडुरंग शाहीर जाहला कीर्ति गावया सिद्धमति ॥ ४ ॥

# कल्याणचा खजिना लूट

## शाहीर पां. द. खाडिलकर

शपथ घेतली शिवराजानं राज्य हिंदवी करण्याची। जिवाभावाचे मित्र जमविले केली तयारी युद्धाची॥ कंक येसाजी बाजी फसलकर जिवाजी शूर हि माण-कोजी। इंगळ्या सुभानजी वीर हिरोजी पिलाजी नेता तानाजी॥ कैक असे हे मित्र जमविले झाली तयारी लढण्याची॥जी॥

### चाल

तोरणा गड जिंकून आरंभ केला॥ स्वराज्याचे तोरण बांधलं तोरणा किल्ल्याला॥ असा व्याप वाढतच गेला। पण पैसा कुठून आणायचा कार्याला। तेव्हां शत्रूची लूट करण्याचा बेत तो केला॥ कल्याणचा खजिना चालला होता विजापूरला। तो खजिना आला बोरघाटाला। मावळ्यांनीं लुटून फस्त केला। सारा पैसा नेला पुण्याला। अन् इकडे कल्याणवर जोराचा हल्ला चढविला। आबाजी सोनदेवानं जोराचा हल्ला केला। अन् कल्याणचा सुभा मराठ्यांनीं आणला हाताला॥ कैद केलं सुभेदाराला। कैद केलं त्याच्या सुनेला। सारी वार्ता कळली शिवाजीला। तेंव्हा राजा कल्याणला गेला। अन् मोठा दरबार त्यानं भरविला। बक्षिस, वस्त्रं नजराणे दिले कितिकाला। आबाजी सोनदेव बोलला शिवाजी राजाला॥ "महाराज, लूट ही आणली आपल्या चरणाला। पण त्या लुटींत अशी एक वस्तू सांपडली आहे कीं तशी कुणी कधिं नसेल पाहिली या काळा"। असं म्हणून बोलती चालती नार आणली सदरेला॥१॥

### लावणी

पाहुनी रूप तिचं सुंदर। लाजला हृदयीं रतीचा वर। इंदिरा आली भूवर। मनोहर नार॥खरी॥ जी॥ वेचुनी तिळ तिळ जगिं सुंदर। घडविलं रूप तिचं मनोहर। जणुं मदनानं खंजीर। केला तय्यार॥ खरा॥ जी॥

### पोवाडा चाल

रूप पाहुनी चकित झाला दैवि गुणांचा तो पुतळा। सात्त्विकतेचे भाव

उमटले बोल्ड लागला तरुणीला ॥ जी ॥ "आईसारख्या तुम्ही मजला बाई सांगतो तुम्हांला। भिऊं नका तुम्ही जावें येथून त्रास न कसला जीवाला" ॥

चाल

शिपायांच्याकडं मग वळून शिवबा बोलला ॥ "ऐकावे बोल मोलाचे आतां या वेळां ॥

कटाव

स्त्री दुसऱ्याची आपली माता। विचार हा आणावा चित्ता। कराल कोणी विटंबनेला। तर कडेलोटाची शिक्षा त्याला। हात तोडुनी, डोळे काढुनी, गर्दन उडवू, निश्चय झाला ॥

चाल

कोण स्त्री जर हातीं लागली करा तिचा तुम्ही सत्कार। सन्मानाने तिला वागवा तरीच तुम्ही झुंजार ॥ आज्ञा माझी कडक अशी ही कळवा सगळ्या लोकांला। या आज्ञेच्या मर्यादेंतुन राजा ही नाहीं सुटला" ॥ असं म्हणून मानानं पाठविलं मग तिला ॥ २ ॥

मौलाना, सुनेसह गेला विजापूरला। अन् अहमद दरबारांत गेला आणि लागला सांगायला लोकांला। शिवाजीनं पुंडावा केला। त्याला धरून आणिल असा कोण आहे बोला? । शिवाजीला धरणं हें कार्य बिकट वाटतं मला ॥

चाल

घालुनिया घेर धरलं या सुभेदारा। तुमच्या। बोरघाटीं तो खजिना झुंजुनिया दूर नेला। मारुनिया ठार सारा दूर पळविला। खजिना। सून माझी फार प्यारी। दूर गेले घेऊनीया। शिवा लेकिन बडोत अच्छा। सोडलं आम्हां दोघां। येत केव्हां जात केव्हां ठावं नाहीं हें कुणाला। लढनेवाला है मराठा। नाश हा झाला समजा। सभा झाली बरखास्त गेले सारे निघून त्या वेळा ॥ असा पहिला विजय मोठा मिळविला। शिवाजीचे नांव हो झाले चारी बाजूला ॥ ३ ॥

# शिवरायांचे पुण्यस्मरण

**शाहीर पां. द. खाडिलकर**

पन्नास वर्षे अखड झुंजुनि राज्य हिंदवी स्थापियलें। महाराष्ट्राला समर्थ केलें धन्य धन्य शिवबा झाले॥ जी॥ पन्नास वर्षे जीवन जगले कार्य परी अद्भुत केलें। चैत्र शुद्ध पौर्णिमेस त्यांचें जीवन संपुनियां गेलें॥ जी॥ चंदनी रचुनी चितेला। राजदेह वरति ठेविला। अग्निला देह तो दिला। अन् ज्वाला धडधडा भिडल्या पहा गगनाला॥ जी॥

**चाल**

वाघ्या कुतरा तो राजाचा वेगानें धावुनि आला। झडप टाकुनी अग्नीवरती तो हि पहा जळुनी गेला॥ जी॥ राजाचा अंत जाहला। पण कीर्तिची मिठी कायमची पडली देहाला॥ शौर्य ही सोडेना त्याला। जनसेवा सोडेना त्याला। चैत्राच्या शुद्ध पुनवेला। भर दुपारच्या वेळेला। सूर्यानं राजाचा आत्मा ओढुनी नेला॥ जी॥ पार्थिव देह हरपला। पण कीर्तिनं अमर तो केला। रायगड रडूं लागला। झाडं झुडपं कोमेजुन गेलीं आकांत झाला॥ जी॥ खूबलढा बुरुज तो तेव्हां रडूं लागला॥ जी॥ हिरकणी बुरुज गहिवरला। टकमक बुरुज पोरका झाला। धर्माचा आधार गेला॥

**चाल**

शिवछत्रपती निघुनी गेले तीनशें वर्षं झालीं त्याला। काळ झराझर निघुनी गेला यशोगंध परि दरवळला॥ जी॥ महाराष्ट्राचा कानाकोपरा शिवकार्यानें व्यापियला। असा राजा कधिं नाहीं झाला पुढें कधी नच होणारा॥ जी॥ युक्तिबुद्धिनें पराक्रमानें परकी सत्ता लोळविली। अन्न मावळे फुंकर मारुन सेना त्यांचि खडी केली॥ जी॥ पांच शाह्यांना पुरुनी उरले फितुरहि नाहींसे केले। राजाच्या त्या पराक्रमाने सर्व मावळे भारविले॥ जी॥ पन्नास वर्षे कणाकणानें अर्पण केलीं देशाला। मार्तीतुन स्वातंत्र्य निर्मिलें असा पराक्रम हा केला॥ जी॥ प्रचंड शत्रू चाळून आले तरी वीर नच डगमगला। त्या वैऱ्यांना दूर पळविले तोड नसे या कार्याला॥ जी॥ संकटें आणि मृत्यूशी सामना केला॥ कधिं

उसंत नाहीं त्याला। मावळ्यांचे सैन्य बनविलें लढा देण्याला ॥ जी ॥ जिवा-भावाचा मित्र जमविला। स्वातंत्र्याचा छंद घेतला। आणि महाराष्ट्र स्वतंत्र केला ॥

## चाल

असा छत्रपति कधिं ना झाला पुढें कधीं नच होणारा। शिवरायांचें नांव सदोदित देवो स्फूर्ती आम्हाला ॥ जी ॥ खडकांतुन स्वातंत्र्य फुलविलें स्वाभिमान जागा केला। वंदन करितो शिवप्रभूला पांडुरंग हा या वेळा ॥ जी ॥